



# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - १ ले. ✻ अंक २६७ वा. ✻ मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 1 ✻ Ishue - 267 ✻ Tuesday 29 April 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


## येवती–म्हासोली प्रकल्पाच्या बंदिस्त पाईपलाईन आराखड्याला मंजुरी

### आ.डॉ.अतुलबाबा भोसले यांच्या प्रयत्नांना यश



कराड : कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी वेळोवेळी केलेल्या प्रयत्नांमुळे, येवती – म्हासोली मध्यम प्रकल्प लाभक्षेत्राच्या सिंचनांतर्गत पाणी देण्यासाठी, करावयाच्या मुख्य बंदिस्त नलिका व वितरण व्यवस्था कामाच्या आराखड्याला जलसंपदा विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे लवकरच या बंदिस्त पाईपलाईन योजनेचे काम सुरू होणार असून, या योजनेच्या लाभक्षेत्रातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना अधिक कार्यक्षम पद्धतीने पाणीपुरवठ्याची सोय उपलब्ध होणार आहे.

टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत १९९४ मध्ये येवती–म्हासोली मध्यम प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या अंतर्गत दक्षिण मांड नदीच्या तिरावरील येवती येथील धरणाच्या डाव्या कालव्यातून पाण्याचे वितरण केले जाते. हा Sवा कालवा आणि त्याच्या लघुवितरिका बहुतांश डोंगराळ भागातून जातात. शिवाय या कालव्याच्या कामाला सुमारे ३० वर्षे उलटल्याने अनेक ठिकाणी पाण्याची मोठ्या प्रमाणावर गळती होते. ज्यामुळे शेवटच्या गावापर्यंत पाणी पूर्ण क्षमतेने पोहोचत नाही. वास्तविक या धरणातून वर्षातून केवळ २– ३ वेळाच पाणी सोडले जाते. त्यातही अनेक ठिकाणी पाणी पाझरते व त्याचा अपव्यय होत असल्याने पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध न झाल्याने या भागातील शेतीसमोर गंभीर संकट उभे राहते.

अशावेळी धरणातून होणाऱ्या पाण्याचा पुरवठा बंदिस्त पाइपलाइनद्वारे केल्यास शेवटच्या ठिकाणापर्यंत पाणी, थेट अपव्यव न होता पूर्ण क्षमतेने पोहोचू शकते. त्यामुळे या ठिकाणी बंदिस्त पाइपलाइन करावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून ग्रामस्थांमधून होत होती. ही मागणी डॉ. अतुलबाबा भोसले यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भेट घेऊन केली होती. त्यावेळी त्यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासनास कार्यवाहीचे आदेश दिले होते. त्यानुसार आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे येवती – म्हासोली मध्यम प्रकल्प लाभक्षेत्राच्या सिंचनांतर्गत पाणी देण्यासाठी करावयाच्या मुख्य बंदिस्त नलिका व वितरण व्यवस्था कामाच्या आराखड्याला जलसंपदा विभागाने मंजुरी दिली आहे. लवकरच या कामाला प्रारंभ होणार असून, या बंदिस्त पाइपलाइनमुळे कमीतकमी पाण्याचा अपव्यय होईल, अशा पद्धतीने अधिकाधिक क्षेत्राला सिंचन सेवा प्रदान केली जाणार आहे. तसेच पाणी वितरण कार्यक्षमता वाढविण्यासाठी आधुनिक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर, सिंचनाखालील क्षेत्रात वाढ, स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ आणि जलसंधारणास चालना मिळणार आहे. तसेच ओंड, तुळसण, सवादे, म्हासोली, शेळकेवाडी यासह आसपासच्या गावांमधील शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागण्यास मदत होणार आहे.



### कुस्ती मैदानास माजी मंत्री श्री.बाळासाहेब पाटील यांनी भेट

कराड : कोरेगांव तालुक्यातील साप येथील श्री कालभैरव यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती मैदानास राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री श्री.बाळासाहेब पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांच्या हस्ते कुस्ती लावण्यात आली, यावेळी त्यांनी कुस्तीगीरांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी किरण जाधव आबा उपसरपंच संदीप जाधव, राजेंद्र जाधव, सुनील जाधव आप्पा, रामचंद्र जाधव हितेश जाधव, संतोष जाधव, विजय जाधव वकील साहेब, भानुदास जाधव, संभाजी जाधव, एम.एच. जाधव सर तसेच कुस्तीगीर, कुस्तीशौकिन उपस्थित होते.



**तयारी अक्षय तृतीयेच्या पितृऋणाची..**

३० एप्रिल रोजी साजरा होणाऱ्या साडेतीन मुहूर्तापैकी एक मानल्या जाणाऱ्या अक्षय तृतीया सणाला मोठे महत्त्व आहे. या सणा दिवशी आपले पूर्वज आणि पितृदेवता यांचे स्मरण करून त्यांना मातीच्या सुघटातून पाणी देण्याची प्रथा आहे. या विधीसाठी लागणारे मातीचे सुघट सातारा शहरातील राजवाडा गोल बागेजवळ मोठ्या प्रमाणात विक्रीस आले आहेत. दरवर्षी अक्षय तृतीयेला हे पितृऋण अशा पद्धतीने जलदान करून साजरे होते.

**फोटो ..अतुल देशपांडे, सातारा**



**आवक रानमेव्याची..**

सातारा शहर परिसरात सध्या विशेष करून राजवाडा ,मंगळवार पेठ येथील शाहू कला मंदिर चौक येथे बामणोली ,कास ,ठोसेघर, चाळकेवाडी परिसरातून जंगलचा रानमेवा अर्थात छोटी काळी जांभळे, करवंदे, बोरणे मोठ्या प्रमाणात विक्रीस आले आहेत. दरवर्षी सातारकर नागरिक हा जंगलचा रानमेवा अगदी स्वस्तात मस्तपणे दररोज खरेदी करून या विक्रेत्यांना मदत करतात .असाच हा रानमेवा गवई विठ्ठल मंदिर परिसरातील चौकात असणाऱ्या पिंपळाच्या झाडाचा सावलीत महिला विक्रेत्यांनी आणला आहे.

**फोटो ..अतुल देशपांडे, सातारा**

## महाराष्ट्रातील संपादकांनी घेतली राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची भेट



जयपूर : असोसिएशन स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या राष्ट्रीय संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी महाराष्ट्रातून वृत्तपत्राचे संपादक उपस्थित राहिले होते. दरम्यान राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची राजभवनात जाऊन सदिच्छा भेट घेतली.

यावेळी गोरख तावरे(कराड), मुकुंद जोशी (गडचिरोली), नेताजी मेश्राम (चंद्रपूर), शोभा जयपुरकर (नागपूर) उपस्थित होते. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा असोसिएशन स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडियाच्या वतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान अधिवेशनासंबंधी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी माहिती जाणून घेतली. महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांना अधिवेशनासंबंधी सविस्तर माहिती दिली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्षपदी केशवदत्त चंडोला (कानपूर) यांची निवड झाल्याची माहिती त्यांना यावेळी देण्यात आली.

**अपरिहार्य कारणास्तव असोसिएशन स्मॉल अँड मिडीयम न्युज पेपर ऑफ इंडिया संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी मला उपस्थित राहता आले नाही अशी खंत ही राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केली.**

## रेल्वे स्टेशनवर चहा विक्रेत्यांवर कारवाई

नवी मुंबई : कोकण विभागाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या रेल्वे स्थानकावरील स्टॉलवर चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री होत असते. सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र कोकण विभागचे शिवाजी काकडे, यांच्या सूचनेवरून नूकतिच कारवाई करण्यात आली.

तसेच ठाणे जिल्हयातील कल्याण व ठाणे, पालघर जिल्हयातील वसई, रायगड जिल्हयातील पनवेल व कर्जत, रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण व रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयातील कुडाळ या रेल्वे स्टेशनवर संबंधित जिल्हा उपनियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री करणाऱ्या आस्थापनांवर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैधमापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांनी अचानक भेटी देवून नूकतिच कारवाई करण्यात आली. वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये तपासणी केली.

रेल्वे स्टेशनवरील चहा विक्री करणाऱ्या आस्थापनांना १५०/१८० मिली एवढी घोषित प्रमाण असताना तपासणीमध्ये ३० ते ८० मिली एव्हढा चहा कमी देत असल्याचे आढळून आले.

अश्या एकूण ७ आस्थापनांवर वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये प्रकरण दाखल करण्यात आले. वापरात असलेली तोलन उपकरणे विहित मुदतीत फेर पडताळणी व मुद्रांकन करून न घेतल्यामुळे ०४ प्रकरणे दाखल करण्यात आली. चिपळूण व रत्नागिरी स्टेशन वरील आस्थापनेवर विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आवेष्टित वस्तूवर नियमातील तरतूदीन्वये आवेष्टनावर घोषवाक्य नमूद न केल्यामूळे प्रकरण दाखल करण्यात आले आहे.अशी माहिती पत्रकान्वय कोकण विभागाचे सह नियंत्रक,वैध मापन शास्त्राचे शिवाजी काकडे यांनी दिली.



**थंडा थंडा कुल कुल..**

एकीकडे उन्हाचा पारा चाळीस अंशापेक्षा जास्त जात असताना सातारा शहरातील सोमवार पेठेतील फुटका तलाव येथे सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत जीवाला थंडावा मिळवण्यासाठी, पोहण्यासाठी आबाल वृद्धांची मोठी गर्दी होत आहे.

**फोटो ..अतुल देशपांडे, सातारा**

## मा.खा.श्रीनिवास पाटील यांनी घेतले ग्रामदैवत श्री निनाईदेवीचे दर्शन





मल्हारपेठ – गावची यात्रा म्हंटले की प्रत्येकाला आकर्षण, उत्साह व आनंद हा असतोच. माजी खासदार श्रीनिवास पाटील यांनी त्यांच्या मारूल हवेली गावचे ग्रामदैवत श्री निनाईदेवीच्या यात्रेचा मुख्य दिवशी यानिमित्ताने सहकुटुंब उपस्थित राहून दर्शन घेतले.मा. खासदार श्रीनिवास पाटील म्हणाले, गावची यात्रा ही आपल्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडवते. गुलालाची उधळण आणि चांगभलंचा गजर करत ग्रामदैवतचा काढलेला छबिना. यात्रेत लागलेली मेवा-मिठाई, खेळण्या-पाळण्यांची दुकाने आणि सर्वांच्या आवडीचे लाल मातीतील कुस्त्यांचे जंगी मैदान. याशिवाय गावकऱ्यांनी यात्रा मोठ्या स्वरूपात पार पाडण्यासाठी केलेले नेटके नियोजन व त्यासाठी घेतलेले परिश्रम हे सर्व सामाजिक ऐक्य भावनांची जपणूक करतात. यात्रेनिमित्त चाकरमान्यांचे गावाकडे आवर्जून येणं तर पै-पाहुण्यांचा वाढलेला राबता. हा सर्व माहोल आपल्याला जत्रेकडे खेचतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.दरवर्षी साजरी केली जात असलेली यात्रा सर्व समाज, सर्व गावं, प्रत्येक वयोगटातील सारे लोक यांना घेऊनच जत्रायात्रा फुलतात व आपलेपण जपत असतो असेही माजी खासदार श्रीनिवास पाटील यांनी सांगितले.

## ग्रंथपाल संजय शिंदे मंगळवारी सेवानिवृत्त



कराड : कराड नगरपरिषद नगर वाचनालयाचे ग्रंथपाल संजय शिंदे हे नियत वयोमानानुसार बुधवार ३० रोजी सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्त मंगळवार २९ रोजी सायंकाळी नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. संजय शिंदे यांनी कराड नगरपालिकेत १९९० सालापासून सेवेस प्रारंभ केला. काही काळ हंगामी कर्मचारी म्हणून काम केल्यानंतर १९९७ मध्ये ते कायम झाले २००० साली सहाय्यक ग्रंथपाल म्हणून आणि नंतर ग्रंथपाल पदी त्यांची नियुक्ती झाली. गेली २४ वर्षे कराड नगरपालिकेत ग्रंथपाल म्हणून काम करताना संजय शिंदे यांनी ग्रंथालयाच्या प्रगतीमध्ये मोठे योगदान दिले आहे.

कराडची शारदीय व्याख्यानमाला अखंडपणे आयोजित करण्यात त्यांनी परिश्रम घेतले. त्यांच्याच काळात नगर वाचनालयात स्पर्धा परीक्षार्थींसाठी अभ्यासिका सुरू करण्यात आली. या अभ्यासिकेचा लाभ घेऊन आतापर्यंत सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत शासकीय नोकरी संपादन केली आहे. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन कराड नगर वाचनालयाने २०१० साली घेतले होते तर २०१८ साली जिल्हा ग्रंथालय संघाचे विशेष अधिवेशन घेण्यात आले तर २०२२ जिल्हा ग्रंथ महोत्सव ही कराडमध्ये पार पडला आहे. सौरभ पाटील यांच्या सहकार्याने पुस्तकांची बाग हा उपक्रमही राबवला होता.

## पश्चिम महाराष्ट्र कासार प्रीमियर लीगचा शुभारंभ



कराड : पश्चिम महाराष्ट्र कासार विकास समिती आयोजित, पश्चिम महाराष्ट्र कासार प्रीमियर लीग २०२५ चा शुभारंभ राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते, वाखान रोड कराड येथे संपन्न झाला.

याप्रसंगी प्रशांत यादव, प्रकाश दादा तवटे, सनतकुमार कुंदप, दीपक अंदुरे, महेश कोकीळ, अमित पालकर, गणेश त्रिभुवणे, डॉ संजय मोहिरे, संजीव मोहिरे, हेमंत कासार, अमित तवटे, संजय डोळ, श्याम मोहोळकर, संजय तवटे मोहन डोळ तसेच क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

या सोहळ्यात क्रिकेटचा आनंद घेतला, तसेच नाणेफेक करून सामन्याची सुरुवात केली आणि सर्व संघ, खेळाडू व आयोजकांना यशस्वी स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेमध्ये पंढरपूर पुणे, चंदगढ तसेच महाराष्ट्रातील विविध भागातील संघांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला आहे, या स्पर्धेमुळे युवा खेळाडूंना आपली कौशल्ये दाखवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. क्रिकेटप्रेमींना उत्कंठावर्धक सामने पाहायला मिळणार मिळतील.

**सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये सहकार क्षेत्रातील मैदानावर आपले वर्चस्व सिद्ध केल्यानंतर हातात बॅट घेऊन बाळासाहेब पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्र कासार प्रीमियर लीग २०२५ चा शुभारंभ प्रसंगी फटकेबाजी केली.**

## अस्मानीचे प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांचा सत्कार



जयपूर : असोसिएशन स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या राष्ट्रीय संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष म्हणून प्रदीप कुलकर्णी (माजलगाव – धुळे) यांचे फेर निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संघटनेचे गोरख तावरे(कराड), मुकुंद जोशी (गडचिरोली), नेताजी मेश्राम (चंद्रपूर), शोभा जयपुरकर (नागपूर) यांनी नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी याचा सत्कार केला. अस्मानी संघटनेत पुन्हा एकदा मला प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. सर्वांना विश्वासच घेऊन सकारात्मक काम करण्याची हमी प्रदीप कुलकर्णी यांनी यावेळी दिली.

## संपादकीय....

# आर्थिक झळ पोहचली...!

परदेशातून आलेल्या तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञांच्या बळावर अमेरिकेची भरभराट झाली; परंतु अमेरिकेतील गोऱ्या लोकांना या सर्व बदलामध्ये आर्थिक झळ पोहोचली. म्हणूनच त्यांनी ट्रम्प यांना भरघोस मते देऊन सत्तेवर आणले. दूरदृष्टी नसणारे ट्रम्प सरकार वेगवेगळे कायदे करून अमेरिकास्थित ग्रीनकार्डधारक भारतीयांचे जगणे कठीण करत आहे. आता अशा अवस्थेत अनेक भारतीय मायदेशी परतण्याची संधी शोधत आहेत. परकीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मदतीवर कुऱ्हाड टाकल्यामुळे या वर्षीपासून उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाणाऱ्या लोकांचा लोंढा जवळपास थांबला आहे. बहुतांश प्रतिभावान पण मध्यमवर्गीय विद्यार्थी केवळ या भरघोस शिष्यवृत्त्यांमुळेच अमेरिकेकडे आकृष्ट होत असत. अर्थातच धनाढ्य लोक आणि राजकारणी वशिलेबाजी करुन पाल्यांना ‘पेमेंट सीट’वर अमेरिकेत पाठवत असत; परंतु अमेरिकेतील एकूण विद्यार्थीसंख्येमध्ये यांचे प्रमाण बरेच कमी होते. अमेरिकेला जाण्याचा रस्ता बंद झाल्यामुळे इच्छा नसूनही अनेक प्रतिभावान शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ भारतात संधीच्या शोधात आहेत. पण गेल्या अनेक वर्षांपासून संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात निधी देण्याबाबत सरकारने हात आखडता घेतला आहे. त्यातच भारतातल्या ‘बाबू राज्या’मध्ये संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांवर जीएसटीचाही भार टाकला गेला आहे. एकीकडे सरकारी अनुदानानेच सरकारी प्रयोगशाळांसाठी खरेदी केलेल्या वस्तूंवर सरकार कर लादून पैसा एका खिशातून दुसऱ्या खिशात टाकत आहे. परिणामी शास्त्रज्ञांना संशोधनाऐवजी गुंतागुंतींचे नियम आणि उपकरणे मिळवण्यातच वेळ दवडावा लागतो.

मोदी सरकारने इतर अनेक चांगल्या गोष्टी केल्या हे निर्विवाद परंतु सरकारी ‘लाल फितीचा कारभार’ तसेच ‘इन्स्पेक्टर राज’ला त्यांना धक्का लावता आलेला नाही. याची काही साधी उदाहरणे म्हणजे गेल्या ७०-७५ वर्षांमध्ये केवळ चार-पाच भारतीयांनाच नोबेल पुरस्कार मिळाला आहे. त्यातही हरगोविंद खुराणांपासून व्यंकी रामकृष्ण यांच्यापर्यंत सर्वच्या सर्व भारताबाहेरच काम करत होते. दुर्दैवाने आपल्या अर्थखात्यावर कारकुनी वृत्तीचा जबरदस्त पगडा आहे. त्यामुळे शास्त्र आणि तंत्रज्ञान यातील संशोधनावर झालेला खर्च अनाठायी आहे, अशी धारणा दिसते.

ही परिस्थिती बदलायची असेल तर उद्योगधंदे उभारायला ‘एक खिडकी योजना’ सारखे कार्यक्रम राबवले जाण्याची तसेच संशोधनासाठीही काही योजना राबवण्याची गरज आहे. एक तीन कलमी कार्यक्रम लवकरात लवकर अमलात आणण्याचीही गरज आहे. यातील पहिला मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळच्या वेळी दिली जावी आणि संशोधनासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या दुप्पट केल्या जाव्यात. या सर्वांसाठी लागणारा निधी आयआयटी किंवा आयसरसारख्या महत्त्वाच्या संस्थांना वेळेवर दिला जावा. संशोधनासाठी मंजूर झालेला निधी काही कारणांमुळे ३१ मार्चपर्यंत खर्च न झाल्यास आपोआपच पुढील वर्षापर्यंत मुदतवाढ मिळावी. ही काही नवी बाब नाही. वाजपेयींच्या काळात संरक्षण तसेच इतर क्षेत्रातील संशोधनाबाबत अशाच प्रकारचे नियम आखले गेले होते; परंतु यूपीए सरकार आल्यावर ही चांगली सुधारणा रद्द केली गेली आणि ३१ मार्चपर्यंत खर्च न झालेला निधी सरकारजमा करुन अर्थसंकल्पात शिल्लक दाखवण्यात अर्थमंत्री धन्यता मानू लागले.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नव्या प्रणालीनुसार स्वयंपूर्णतेच्या नावाखाली संशोधनासाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदीही केंद्रीयकृत केली गेली आहे. देश आत्मनिर्भर असावा आणि गरज नसताना आयात केली जाऊ नये, हा उद्देश स्तुत्य आहे; परंतु संशोधनासाठी लागणारी उपकरणे किंवा वस्तू सर्वसाधारण व्यापारात बसत नाहीत. उदाहरणार्थ, संशोधनासाठी लागणारी काही रसायने ९९ टक्के शुद्ध असावी लागतात. जगभरात याची मागणी जेमतेम १००-२०० किलोग्राम असते. त्यामुळे अशा प्रकारची खास रसायने वा उपकरणे तयार करणारे उद्योग जगात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. त्यांच्याकडून आयात करण्याखेरीज पर्याय नाही. खेरीज केवळ वर्षाला १०-१५ किलो लागणारी रसायने बनवण्यासाठी कोणी कारखानाही उभा करु शकत नाही. संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांचे तसेच पदार्थांचे हे विशेष लक्षात घेऊन या वस्तूंच्या खरेदीचे केंद्रीकरण करणे चुकीचे आहे.

# संगम माहुली येथे महाराणी ताराबाई यांचे भव्य स्मारक उभारणार : ना.शिवेंद्रसिंहराजे

## थोरले शाहू महाराज, राणी येसूबाई यांच्याही स्मारकाच्या जतन व संवर्धनाचा निर्णय

सातारा- ऐतिहासिक सातारा येथील संगम माहुली येथे छत्रपती थोरले शाहू महाराज, राणी येसूबाई आणि महाराणी ताराबाई यांची समाधी आहे. याठिकाणी लवकरच महाराणी ताराबाई यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकासह एकत्रितपणे थोरले शाहू महाराज, राणी येसूबाई यांच्या स्मारकाचे जतन आणि संवर्धन करणे तसेच येथील सर्व मंदिरांची डागडुजी करणे, घाटाची दुरुस्ती व संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करून संगम माहुली एक पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यात येणार असल्याचे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट केले.



सातारा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान असलेली वास्तू राज्य संरक्षित स्मारक करणे तसेच महाराणी ताराबाई यांचे संगम माहुली येथे स्मारक उभारणे आणि संगम माहुली परिसर सुशोभित व विकसित करणे यासंदर्भात ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात महत्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संतोष रोकडे, कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी शशिकांत माळी, कोल्हापूर येथील वास्तू अभियंता इंद्रजित नागेशकर, श्रीपाद कुलकर्णी, वन विभागाच्या अदिती भारद्वाज, पुरातत्व विभागाचे अधिकारी एच. व्ही. बारगजे आदी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत वास्तू अभियंता इंद्रजित नागेशकर यांनी संगम माहुली येथील प्रस्तावित स्मारक जतन व संवर्धनासंदर्भातील तयार केलेल्या आराखड्याची चित्रफीत दाखवून करावयाच्या कामांची माहिती दिली. बैठकीत झालेल्या चर्चेनंतर संगम माहुली येथे थोरले शाहू महाराज, राणी येसूबाई आणि ताराबाई यांची स्मारके एकत्रित जतन व संवर्धित करणे तसेच इतरही काही समाधीस्थळांचे संवर्धन करणे, संगम माहुली येथील सर्व मंदिरांची डागडुजी व संवर्धन करणे, पर्यटनवाढीच्या दृष्टीने घाट विकसित करणे, लाईटची व्यवस्था करणे, नदीकाठी होणाऱ्या दशक्रिया विधीसाठीची जागा सोयीसुविधांनी विकसित करणे, वृक्षारोपण करणे, येथील रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे तसेच पार्किंग व्यवस्था करणे, पर्यटकांना विविध सोयी सुविधा निर्माण करणे, स्वच्छतागृह बांधणे, नदीवरून पलीकडे पायी जाण्यासाठी नदीवरील केबल ब्रिजची पुनर्रबांधणी करणे, संपूर्ण परिसर विकसित करून येथील ग्रामपंचायतींना उत्पन्न वाढीचे स्रोत निर्माण करणे आदी निर्णय घेण्यात आले. हा परिसर विकसित करताना ऐतिहासिक धर्तीवर बांधकामे करणे आणि नदीतील पुराच्या पाण्यामुळे बांधकामांना कोणतीही हानी पोहचू नये अशा पद्धतीने बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठीचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्याच्या सूचना ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

दरम्यान, सदरबाजार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवास्थान असलेली वास्तू राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आली असून हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने येणाऱ्या अडचणींचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

संबंधित जागा मालकाला जागेचा योग्य मोबदला देणे आणि इतर अडचणी दूर करणे याबाबतचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करा. यासंदर्भात राज्य सरकार स्तरावर बैठक लावून तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे ना. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले. बैठकीत किल्ले अजिंक्यतारा येथे डागडुजी तसेच सुशोभीकरण करणे, किल्ल्यावरील मंदिरांचे जतन व संवर्धन, कार्यक्रमांसाठी छोटेखानी सभामंडप उभारणे, किल्ल्यावर ठिकठिकाणी राज्यातील विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारणे, दक्षिण दरवाजाकडील रस्त्याचे दगडी बांधकाम करणे, ठिकठिकाणी लाईटची व्यवस्था करणे आदी विषयांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# दहशतवादी हल्ल्याचा मसूरमध्ये बंद पाळून निषेध

मसूर : काश्मीर पहलगाम येथे भारतीय पर्यटकांच्या वर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शनिवार दि.२६ रोजी मसूर येथील जुना बस स्थानक चौकामध्ये सर्व मसूरकर नागरिकासह व्यापारी वर्गाने स्वयंस्फूर्तीने मसूर बंद पाळत सर्व दुकाने बंद ठेवली.




बंद मुळे बाजारपेठेत शुकशुकाट होता. दहशतवादी हल्ल्याच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी मसूर बंदची हाक देण्यात आली होती. मसूर मधील सर्व धर्मीय व्यापाऱ्यांनी बंदला प्रतिसाद देत उस्फूर्तपणे स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने बंद ठेवली होती. मात्र सर्वसामान्यांचे रुग्णांचे हाल होऊ नये त्याकरिता अत्यावश्यक सेवा चालू ठेवण्यात आल्या होत्या.

बंद मध्ये सहभागी होऊन दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करूया असा संदेश संपूर्ण मसूर मध्ये वायरल देखील करण्यात आला आहे. याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस नंदकुमार जगदाळे, प्रा. कादर पिरजादे, माजी ग्रामपंचायत सदस्य रमेश जाधव माजी सरपंच प्रकाश माळी, तंटामुक्तीचे अध्यक्ष नरेश माने, संभाजी बर्गे यांनी आपले मनोगत व्यक्त करून सर्व व्यापारी व ग्रामस्थांनी हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहिली.

सर्व धर्मीय लोक एकत्रित येऊन सामूहिक निषेध व्यक्त केला कराड मसूर मसूर उंब्रज मसूर, शामगाव, किवळ या मार्गावरील संपूर्ण वाहतूक व्यवस्था बंद होती. रिक्षा सह प्रवासी वाहतूकदारांनी सुद्धा बंद पाळुन निषेध व्यक्त केला. यावेळी माजी उपसरपंच विजयसिंह जगदाळे, विकास पाटोळे, नितीन जगदाळे, भाऊसाहेब बर्गे वामनराव शिरतोडे बंडा दळवी पिंटू महाजन राजेंद्र जगदाळे साहेबराव यादव यासह सर्व धर्मीय लोकांची उपस्थिती होती.

**मसूर येथील मुस्लिम बांधवांच्या वतीनेही निषेदाचे निवेदन**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करत पाकिस्तानविरुद्ध कठोर कारवाईची मागणी बाबत आज मसूर व मसूर विभागातील मुस्लिम बांधवांच्या वतीने मसूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ खरात यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी अल्पसंख्यांक चे मसूर शहराध्यक्ष जमीर मुल्ला, फैय्याज मोमीन,शकील बागवान, अल्ताफ बागवान, दिलावर सुतार, फिरोज मुल्ला, मोहसीन मोमीन,तोसिफ बागवान असिफ बागवान वसीम बागवान, निहाल बागवान, मोहसिन मोमीन, आकिब मोमीन, उसामा बागवान, यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# श्री गोरक्षनाथ यात्रेनिमित्त दहीहंडी उत्साहात

शिराळा : शिराळा येथील सुरू असलेल्या श्री गोरक्षनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर दहीहंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी मठाधिपती पीर पारसनाथजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. मानाच्या दहीहंडी ची शहरातून वाजतगाजत तसेच फटाक्यांच्या आतषबाजीत मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी याचे मानकरी चंद्रशेखर परदेशी, शीतल परदेशी , शौर्य परदेशी,प्रीती परदेशी,योगिता परदेशी , शैला परदेशी ,शरद कोळी,लता कोळी, तुलसीदास परदेशी,मोतीराम परदेशी, ड सूरज परदेशी,रणजीत परदेशी, रोनक परदेशी, केवल परदेशी, रोनित परदेशी, सचिन परदेशी उपस्थित होते.या मिरवणुकीवेळी प्रत्येक घराजवळ याचे पूजन करून दही अर्पित केले जात होते.ही मिरवणूक सोमवार पेठ, गुरुवार पेठ, मुख्य रस्ता, लक्ष्मी चौक आदी मार्गावरून मंदिराच्या आवारात आणण्यात आली.

मंदिराजवळ दहीहंडी फोडण्याचा मान असणाऱ्या



भालचंद्र कुलकर्णी यांच्या कुटुंबीयातील रत्नाकर कुलकर्णी, सुंदर कुलकर्णी, माधुरी कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी, तेजस कुलकर्णी, उत्कर्ष कुलकर्णी, उमा कुलकर्णी, मनीषा कुलकर्णी यांनी ही दहीहंडी गोरक्षनाथ मंदिर येथे फोडली. दहीहंडीला शेकडो वर्षांची परंपरा आहे जी आजही कायम आहे. यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणात गर्दी झाली असून यावर्षी मोठी उलाढाल होईल अशी आशा व्यापाऱ्यांना आहे. यावर्षी बेळगांवी, पुणे,मुंबई,परळी, कराड, बार्शी, आदी भागातून व्यापारी आले आहेत. शिराळा नगरपंचायत ने सर्व मूलभूत सुविधा येथे दिल्या असून नियोजनही नेटके केले आहे. यात्रेनिमित्त जंगी कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे. आ. सत्यजित देशमुख, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, माजी सभापती ड. भगतसिंग नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्ती मैदान होणार आहे. यात्रा अक्षयतृतीया पर्यंत सुरू राहणार आहे. पीर पारसनाथ महाराज यात्रा व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत.

# जागृत ग्राहक राजाच्या अध्यक्षपदी दिलीप पाटील संघटक दिलीप फडके, सचिव प्रा.नागनाथ स्वामी

मसूर - जागृत ग्राहकराजा सामाजिक संस्थेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी दिलीप पाटील, संघटकपदी दिलीप फडके तर सचिवपदी प्रा. नागनाथ स्वामी यांची बिनविरोध निवड झाली. ग्राहक चळवळीत अग्रणी असलेल्या जागृत ग्राहकराजा सामाजिक संस्थेची राज्यस्तरीय बैठक माळवाडी (मसूर ) येथील स्व. दादासाहेब चव्हाण शैक्षणिक संकुलात झाली. ग्राहक चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते किशोर लुल्ला (सांगली) अध्यक्षस्थानी होते. यावेळी नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली.



कार्यकारिणी : कोषाध्यक्ष विद्याधर कुलकर्णी, उपाध्यक्ष ॲड अनिल गोडबोले, वसुधा सावरकर, सहसंघटक - साधना पाटील, सहकोषाध्यक्ष नयन चव्हाण, राज्य विषय समिती समन्वयक ॲड किशोर लुल्ला, अभ्यास वर्ग प्रमुख वसंतराव आपटे, अभ्यास वर्ग उपप्रमुख प्रा. सतीश जंगम, महिला अध्यक्ष शैला शिळीमकर, महिला संघटक प्राजक्ता पाध्ये, महिला उपाध्यक्ष नयन चव्हाण, सारिका पाटील, महिला सचिव सविता बलकवडे, महिला अध्यक्षा दुर्गताई शुक्रे, अध्यक्ष नवनाथ बांदल, कोकण विभाग अध्यक्ष पवन पोलसांनी, नागपूर विभाग अध्यक्ष दीपक देशपांडे या निवडीबद्दल सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# ॲड.ए.पी.पाटील यांचे गावासाठीचे कार्य कौतुकास्पद-संजय लोहार

ढेबेवाडी : ॲड.ए.पी. पाटील गावासाठी तळमळीने काम करणारे व्यक्तिमत्व असून गाव स्वतंत्र करण्यापासून गावाला भरीव निधी आणण्यासाठी त्यांनी केलेले काम गावच्या इतिहासात नोंद घेण्यासारखे व कौतुकास्पद आहे. ॲड. पाटील विकासरत्न असून त्यांनी गावच्या जडणघडणीत केलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञ राहून आम्ही ग्रामस्थ त्यांचा सत्कार करत आहोत असे प्रतिपादन उपसरपंच संजय लोहार यांनी केले.



ॲड.ए.पी पाटील यांचा गावच्या वतीने अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त नुकताच सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते यावेळी गावातील प्रमुख सर्व मंडळी उपस्थित होती. संजय लोहार पुढे म्हणाले ॲड.ए.पी.पाटील यांनी गावासाठी नेहमीच त्यागाची भूमिका घेतली आहे. गावचे ग्रामपंचायत कार्यालय, समाज मंदिर, पाण्याची टाकी यासाठी जागा बक्षीसपत्र करून दिली, यासाठी कोणताही मोबदला घेतला नाही ते ज्याठिकाणी राजकीय प्रवाहात काम करीत आहेत त्या माध्यमातून गावासाठी विकास कामे आणली गावातील लोकांची व्यक्तिगत कामे मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत असे गावचे विकासरत्न असलेल्या व्यक्तिमत्वाचा सत्कार करताना आम्हाला आनंद होत आहे असे ते म्हणाले.प्रा. पंढरीनाथ कापसे सर म्हणाले, ॲड.ए.पी. पाटील एक नामांकित वकील आहेत त्यांच्या कार्यामुळे गाव चांगले नावारूपास आले. मुले सुना उच्चशिक्षित असून एक गावातील सुसंस्कारी कुटुंब म्हणून ड पाटील यांचे कुटुंब ओळखले जाते. चेअरमन दादासाहेब साळुंखे म्हणाले ॲड.ए पी पाटील अजातशत्रू व्यक्तिमत्व असून राजकीय काम करताना त्यांनी कधी कोणाविषयी राजकीय आकस निर्माण केला नाही एक गावासाठी चांगला आदर्श निर्माण करून दिला. असे त्यांचे चांगले कार्य राहिले आहे. यावेळी अध्यक्ष लालासाहेब पाटील यांचेही भाषण झाले. सदाशिव कदम महाराज यांनी प्रास्ताविक केले. प्रा.सुरेश पाटील यांनी आभार मानले. यावेळी माजी चेअरमन अविनाश साळुंखे, तंटामुक्ती अध्यक्ष अमर पाटील, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब कदम, माजी सदस्य राजू रोडे, माजी श्री राम ट्रस्टचे अध्यक्ष बजरंग पाटील, सचिन लोहार, चेतनाचे संस्थापक अविनाश कापसे, प्रसाद जानुगडे, चेअरमन सरदार पाटील, माजी तंटामुक्ती अध्यक्ष अशोकराव पाटील, दादासाहेब साबळे, सर्जेराव कुंभार, माजी चेअरमन अशोक पाटील, बजरंग भुरुगडे, धनाजी भुरुगडे, दादासाहेब पाटील, राजू शेवाळे, राजू कदम, श्रीकांत कदम,.संजय कदम, सुहास पाटील, विजय साळुंखे, मधुकर चव्हाण आदींनी त्यांचा सत्कार केला.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# दैनिक कृष्णा एक्सप्रेसच्या दणक्याने भटक्या कुत्र्यांचे लसीकरण

रायगड (याकूब सय्यद) : रायगड जिल्ह्यातील नागोठणे शहरातील विविध भागात दोन दिवसात भटके पिसाळलेल्या कुत्र्यांनी धुमाकूळ घातला होता. तसेच १७ ते १८ लोकांना चावा घेऊन जखमी केले त्यात लहान वयोवृद्ध पुरुष व महिला तसेच तरुण माणसांचा समावेश आहे त्यामुळे गावांमध्ये लोक भयभीत झाले होते. लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते घरातील माणसं बाहेर पडण्यासाठी घाबरत होते एवढी मोठी दहशत भटके पिसाळलेल्या कुत्र्यांची संपूर्ण नागोठणे शहरांमध्ये पसरली होती.



या परिस्थितीवर दैनिक कृष्णा एक्सप्रेसच्या प्रसिद्ध वृत्तपत्राने बातमी प्रसिद्ध करताच स्थानिक स्वराज्य संस्था नागोठणे ग्रामपंचायत तसेच प्राणी संघटना रोहा तसेच पशुधन अधिकारी पंचायत समिती रोहा यांनी घेतली. वृत्तपत्राची दखल तसेच यांच्या मार्फत संयुक्तरित्या लसीकरण मोहीम राबवली जाणार आहे. नसबंदी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आले आहे. या प्रशासकीय यंत्रणांनी भटके पिसाळलेले कुत्र्यांच्यावर नसबंदी करण्याची उपाय योजना करण्याचे निर्णय घेतले आहे. असे स्थानिक स्वराज्य संस्था नागोठणे ग्रामपंचायत कडून सांगण्यात आले आहे.

# अस्मानीचे राष्ट्रीय अध्यक्ष केशवदत्त चंडोला यांचा सत्कार

जयपूर : असोसिएशन स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या राष्ट्रीय संघटनेच्या *राष्ट्रीय अधिवेशनामध्ये राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पुन्हा एकदा केशवदत्त




चंडोलाजी यांची फेरनिवड करण्यात आलीआहे. राष्ट्रीय उपाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय अध्यक्ष केशवदत्त चंडोला यांचा महाराष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी बीड (माजलगाव), गोरख तावरे(कराड), मुकुंद जोशी (गडचिरोली), नेताजी मेश्राम (चंद्रपूर), शोभा जयपुरकर (नागपूर) यांनी नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी याचा सत्कार केला.

# संत निरंकारी मिशनद्वारे रक्तदान शिबिर

ढेबेवाडी (महेश जाधव) : प्रेम आणि बंधुभावना जागविणारा 'मानव एकता दिवस', संत निरंकारी मिशनद्वारे दरवर्षी २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचन सिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ श्रद्धा आणि भक्तिभावनेने परिपूर्ण वातावरणात आयोजित केला जातो. हा दिवस केवळ पुण्यस्मरण करण्याचा प्रसंग नसून मानवता, सौहार्द आणि एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम आहे. कराड विमातळ येथे संत निरंकारी सतसंग भवनात आयोजित रक्तदान शिबिरात ९९ दात्यांनी रक्तदान केले.

या शिबिराचे उद्घाटन सातारा झोन ३४ - चे झोनल ईनचार्ज नंदकुमार झांबरे जी, यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी कराडचे मुखी दिलीप कोरडे ( आबा ) यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी कराडसह ढेबेवाडी,नांदगाव,रेठरे बु,उंब्रज बॅंच मधुन मोठा जनसमुदाय उपस्थीत होता. रक्त संकलन साठी जिल्हाउप रुग्नालय कराड उपस्थीत होते. विशेष उपस्थीती माजी विधान परिषदेचे आमदार मा.आनंदराव पाटील (नाना) यांनी रक्तदान शिबीरास सदीच्छ भेट देउन निरंकारी मिशनच्या कार्याबद्दल भरभरुन कौतुक केले.

मानव एकता दिवसाच्या या प्रसंगी मिशनकडून देशभर रक्तदानाच्या एका प्रेरक श्रृंखलेचा शुभारंभ होतो. जी निः स्वार्थ सेवाभावनेच्या सामूहिक जागृतीचे स्वरूप बनून संपूर्ण वर्षभर समाजामध्ये प्रवाहित होत राहते. त्याचबरोबर सत्संग कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रेम, शांती आणि समरसतेचा प्रकाशदेखील जनसामान्यांपर्यंत पोहचविला जातो.

# पहलगाम हल्ल्याने साताऱ्यात काही भाजप कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता

सातारा (अजित जगताप): केंद्र व राज्यांमध्ये महायुतीच्या घटक पक्षासोबत सत्ता आहे. यामध्ये सर्वाधिक योगदान भारतीय जनता पक्षाचे आहे. परंतु २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पहलगाम मधील निसर्ग सौंदर्याचा पर्यटक आनंद घेत असतानाच निष्पाप २६ हिंदू पर्यटकांना गोळ्या घातल्या. या घटनेने संपूर्ण भारत देश हादरला. कडक उन्हाळ्यात निषेधाचा पाऊस कोसळला. पण या सर्व प्रक्रियेमध्ये भाजप काही निष्ठावंत व देशप्रेमी कार्यकर्त्यांची अस्वस्थता लपून राहिलेली नाही. भाजपच्या प्रतिमेला तडा गेला आहे.




गेली अकरा वर्ष भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी भारत देशाचे नेतृत्व करत आहेत. भारतीय जनता पक्ष त्यांचा उल्लेख करताना विश्वगुरू, ५६ इंच छाती असलेला योद्धा आणि हिंदू रक्षक अशी विश्लेषण लावतात. जाहीर सभा व रॅलीमध्ये समर्थक मोदी.. मोदी.. मोदी.. घोषणाबाजी केली जाते. त्याचे विविध चॅनेल वरती चित्रीकरण सातत्याने दाखवले जाते. आज या सर्व पोकळ गोष्टी ठरलेल्या आहेत. गोदी मीडियामध्ये त्याबाबत आवाज उठवला नसला तरी जागतिक स्तरावर भारतीय सुरक्षा रक्षकाची कामगिरी आणि त्याचे विश्लेषण होऊ लागलेले आहे. चुका होणे आणि त्या चुका दुरुस्त करणे. याला महत्त्व आहे. परंतु, चुकांकडे दुर्लक्ष करणे. हे आता देशाच्या सुरक्षेतेलाच आव्हान देणारे ठरले आहे.

महाराष्ट्रात ५०५३ पाकिस्तानी नागरिक आढळून आले त्यापैकी ५१ जणांकडे वैद्य कागदपत्र असली तरी १०७ पाकिस्तानी नागरिक यांचा पत्ता लागत नाही. याला कोणत्या स्ट्राइक म्हणावा? असा आता प्रति प्रश्न केला जात आहे. दरम्यान, सातारा जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाच्या समर्थकांना सुद्धा आता संताप व्यक्त करण्याशिवाय पर्याय नाही. परंतु ,यातून कोणीही कोणाचा राजीनामा मागत नाही. यातच सर्व काही आले आहे. भाजप निष्ठावंतांना तर इतरांना उत्तर देताना अडचणी मध्ये वाढ होत आहे. त्यामुळे समाज माध्यमावर क्रिया प्रतिक्रिया देणारी यंत्रणा ठप्प झाली आहे.

# महाराष्ट्र गौरव रथ यात्रेचे सांगली जिल्ह्यामध्ये स्वागत




इस्लामपुर : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यांच्यावतीने आयोजीत केलेल्या गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ महाराष्ट्र गौरव रथ यात्रेचे सांगली जिल्ह्यामध्ये मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते निशिकांत भोसले-पाटील, जिल्हाध्यक्ष प्रताप पाटील, शहर जिल्हाध्यक्ष मपद्माकर जगदाळे,प्रदेश सरचिटणीस, माजी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, युवा प्रदेश उपाध्यक्ष उत्कर्ष खाडे, वाळवा तालुका अध्यक्ष केदार पाटील,युवा जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील,महिला अध्यक्षा राधिका हार्गे यांनी रथामधील कलशाचे पुजन केले.

निशिकांत भोसले- पाटील म्हणाले,संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला यंदा ६५ वर्षे पूर्ण होत आहेत. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा १ मे दिन ''महाराष्ट्र महोत्सव' उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भव्यदिव्य स्वरूपात साजरा होणार आहे. हा मंगल कलश रथ जिल्ह्यातून जल आणि माती घेऊन मुंबईला जाणार आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

आष्टा शहरात आगमन होताच प्रविण माने,संदीप गायकवाड ,दादासाहेब वाघमारे,संजय सावंत,दत्ताभाऊ कोळेकर यांनी रथाचे स्वागत केले. पलुस येथे निलेश येसुगडे,प्रदीप कदम, मारुती माने, दिलीप जाधव ,कपिल गायकवाड, नंदकुमार निकम,उमेश पाटील यांनी स्वागत केले. स्व.यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या जन्म गावी खा. नितीन पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस कडेगाव तालुका अध्यक्ष कृष्णत मोकळे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना समिती सदस्य राजेंद्र मोहिते, बळीराम मोरे, नामदेव जाधव, देवराष्ट्रे सरपंच निर्मला बोडरे, पंचायत समितीच्या माजी सभापती शोभा होनमाने, उपसरपंच धोर्यशील पाटील, ग्रामपंचायत सदस्य बाबूराव मोरे, प्रमोद महिंद, माणिक मोरे, गोरख मिसाळ, दगडू कुंभार.यांनी स्वागत केले.

क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या येडेमच्छिंद्र येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे पुतणे सुबराव पाटील, शरद पाटील,रावसाहेब पाटील,गणेश हराळे,प्रशांत पाटील,सुभाष चव्हाण, विशाल गाडगे,संतोष पाटील,दिलीप कांबळे,अशोक यादव ,विक्रम शेवाळे, यांनी स्वागत केले. यानंतर वाटेगांव येथे साहित्यरत्न लोकशाहीर आणाभाऊ साठे यांच्या गावी हा गौरवशाली रथ यात्रा पोहचली यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले, यावेळी माजी आमदार शिवाजीराव नाईक, रणधीर नाईक,उपसरपंच सौ.सोनाली पाटील,राहुल पाटील,सारिका पाटील,राजेंद्र पाटील,वसीम जमादार,रमेश साळुंखे,हेमंत मुळीक,तानाजी वायदंडे,दीपक,ठोंबरे, दिग्विजय पाटील, अकबर मुल्ला,उत्तम कांबळे , सूरज नलवडे,यांनी स्वागत केले,पुढे कराड च्या दिशेने ही महाराष्ट्र गौरव यात्रा मार्गस्थ झाली.

यावेळी शहर युवा अध्यक्ष आकाश माने,निवास पाटील,धैर्यशील मोरे,संदीप सावंत,दत्तात्रय पाटील, युवती अध्यक्षा पुजाताई जाधव, शिराळा तालुकाध्यक्ष अशोकराव पाटील, पलूस कडेगांव राष्ट्रवादी कॉंग्रेस ग्रामीण व शहर राष्ट्रवादी पदाधिकारी,सर्व सेल चे अध्यक्ष उपस्थित होते.

# महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव स्थगितीसाठी हिंदुत्ववादी संघटनेची मागणी

महाबळेश्वर(अजित जगताप): संपूर्ण भारत देश पहलगाम पर्यटकांच्या हत्येमध्ये दुःख सागरात बुडाला आहे. अशावेळी मानवता भावनेतून महाबळेश्वर महा पर्यटन महोत्सव स्थगित करण्याची मागणी हिंदुत्ववादी संघटनेने केली आहे. त्याला वाढता पाठिंबा मिळत आहे. महाबळेश्वर येथे देशी विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व अनधिकृत बांधकाम आणि धन लांडग्याची तिजोरी भरण्यासाठी हा महोत्सव असल्याची टीका सामान्य कष्टकरी करत आहेत. या महोत्सवाला स्थानिक भूमिपुत्रांनी आवाज उठवल्यानंतरच बचत गट, स्थानिक कारागीर यांना रोजगार उपलब्ध होणार आहे. ही चांगली गोष्ट आहे. परंतु दुःखद प्रसंगी आनंद उत्सव साजरा करणे योग्य नाही. त्या ऐवजी हा महोत्सव पुढे घेतला तर काही बिघडणार नाही. असं विश्व हिंदू परिषदेचे जितेंद्र वाडेकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत . यासाठी अखिल भारतीय विश्व हिंदू परिषदेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही मागणी केली आहे.






या घटनेच्या पार्श्वभूमीवर महाबळेश्वर येथे २ मे ते ४ मे रोजी होणाऱ्या महा पर्यटन महोत्सव रद्द करून किमान पंधरा दिवस दुखावटा पाळावा. अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे सातारा शहर मंत्री जितेंद्र वाडेकर , हेमंत सोनवणे, कोल्हापुरे , रवी कोठावळे यांनी केली आहे. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर पर्यटन ठिकाणी राज्य शासनाच्या वतीने दोन मे ते चार मे दरम्यान जो महापर्यटन महोत्सव आयोजित केला आहे. हा महा पर्यटन महोत्सव पेहलगाम घटनेच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलावा. किंवा शक्य झालं तर रद्द करावा कारण याच्यामुळे सर्वसामान्य माणसांना अडचणी निर्माण होणार आहे. आतापासूनच वाहतुकीत बदल केल्यामुळे सर्वसामान्य महाबळेश्वर वासीय त्रस्त झालेले आहेत.

त्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व सातारा जिल्हा स्थानिक प्रशासनाने मानवता भावनेतून हा महा पर्यटन महोत्सव स्थगित करावा. अन्यथा इतिहासामध्ये मानवता शून्य महोत्सव अशी नोंद होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. हिंदू समाजामध्ये मृत्यूनंतरचा हा अंतिम विधी महत्त्वाचा असताना त्याच कालावधीमध्ये महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव घेणे म्हणजे दहशतवाद्यांनी हल्ला केलेल्या हिंदू पर्यटकांचा हा अवमान आहे. ज्यांचे जळते त्यांनाच कळते. या प्रमाणे एखाद्याच्या घरी मृत्यू झाल्यास त्याला भेट देण्यासाठी अनेक नामवंत जातात. त्यांच्या सांत्वन करतात तर दुसऱ्या बाजूला असा महोत्सव घेणे कितपत योग्य आहे? चे आत्मचिंतन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# ग्राहक पंचायत कराडचा पदनियुक्ती

## कराड शहर अध्यक्ष नीतीन शहा

## रुग्ण मित्र चळवळ उभारण्याचा निर्धार

कराड : ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य शाखा, कराडची पद्रियुक्ती समारंभ नुकताच संपन्न झाला. शहरातील बाबुभाई पदमसी हॉल येथे आयोजित या समारंभात ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याच्या कोशाध्यक्षा सुनिताराजे घाटगे आणि कराड तालुका अध्यक्ष अधिकराव पाटील यांच्या शुभहस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमात कराड शहर अध्यक्ष म्हणून नितीन शहा यांची निवड करण्यात आली.



या महत्त्वपूर्ण सोहळ्याला प्रमुख उपस्थिती म्हणून ग्राहक पंचायत सातारा जिल्हा सरचिटणीस नंदकुमार काटे आणि मोहनराव घनवट यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. ग्राहक पंचायतचे अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते, कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर, संयुक्तपणे दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात केली.


याप्रसंगी बोलताना सुनिताराजे घाटगे यांनी ग्राहक पंचायतच्या कार्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ग्राहक हक्कांचे संरक्षण करणे आणि ग्राहकांना त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सक्षम करणे हे ग्राहक पंचायतचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देताना आपल्या कार्यामध्ये निष्ठा आणि प्रामाणिकपणा ठेवण्याचे आवाहन केले. तसेच, ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर राहण्याचे मार्गदर्शनही त्यांनी केले.

कराड तालुका अध्यक्ष अधिकराव पाटील यांनी आपल्या मनोगतात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांनी कराड तालुक्यात ग्राहक पंचायतचे कार्य अधिक प्रभावीपणे कसे पुढे नेता येईल, याबद्दल विचार व्यक्त केले. तसेच, तालुका स्तरावर ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी नवीन योजना आणि उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली.

कराड शहरचे नवनिर्वाचित अध्यक्ष नीतीन शहा यांनी आपल्या मनोगतात ग्राहक पंचायतचे कामकाज वाढवण्यासोबतच कराड शहरामध्ये रुग्ण मित्र चळवळ उभारण्याचा मनोदय व्यक्त केला. शहरातील रुग्णांना योग्य मार्गदर्शन मिळावे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी ही चळवळ उपयुक्त ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच शहरातील ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी नवीन योजना आणि उपक्रम राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या पद्रियुक्ती सोहळ्यामध्ये विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी ग्राहक पंचायतच्या माध्यमातून समाजासाठी सक्रियपणे योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या सुरवातीस सहसचिव डॉ. धनंजय खैर यांनी उअपस्थितांचे स्वागत केले तर आभार प्रदर्शन हिरालाल खंडेलवाल यांनी.

# अस्मानीच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड



जयपुर- असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष के डी चंडोला यांनी संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनात केली. संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनाचा दिनांक २७ एप्रिल रोजी दुसरा दिवस होता या अधिवेशनामध्ये राजस्थान अध्यक्ष गोपाल गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर राष्ट्रीय महासचिव शंकर कटीरा यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय अध्यक्ष केडी चंडोला यांनी नंतर बैठकीची सूत्रे हाती घेतल्यानंतर देशभरातील विविध राज्यांच्या राज्याध्यक्ष पदाच्या नेमणुका जाहीर केल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या राज्याध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली .यावेळी अधिवेशनास उपस्थित असलेल्या महाराष्ट्रातील सर्व सदस्यांनी टाळ्याच्या गजरात या घोषणेचे स्वागत केले. व नंतर प्रत्यक्ष भेटून प्रदीप कुलकर्णी यांचे अभिनंदन केले. या समारोप प्रसंगी छाबडा सर, डॉक्टर अमृता मौर्य यांची समायोजित भाषणे झाले. राष्ट्रीय कार्यकारिणी व राष्ट्रीय कार्यकारणीतील इतर सदस्यांची घोषणा एक आठवड्याच्या आत करण्यात येईल असे यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष चंदोला यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# रुग्णांना आपल्या हक्काची सनद माहिती असावी : उमेश चव्हाण

## माजी खा.स्व.प्रेमलाताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट व संकल्प सामाजिक संस्थेच्यावतीने व्याख्यान

कराड : डॉक्टर हे हॉस्पिटलचे बांधील पद असून, धर्मादाय हॉस्पिटल अथवा चॅरिटेबल ट्रस्टचे चालक हेच महत्वाचे असतात. धर्मादाय हॉस्पिटल व चॅरिटेबल ट्रस्टचे दवाखाने गोरगरीब रुग्णांसाठी मोफत असतात. याची माहिती आपणास नसल्याने आपण अज्ञानपणाने त्या हॉस्पिटलच्या पिळवणूकीला बळी पडतो. याकरिता रुग्णांच्या हक्काची असणारी सनद आपल्याला माहिती असावी. असे मत रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी व्यक्त केले.

कराड येथील सौ. वेणूताई चव्हाण सभागृहात माजी खासदार (स्व.) प्रेमलाताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट व संकल्प सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या हॉस्पिटलचे बिल माफ कसे करावे तसेच रुग्णांचे हक्क व अधिकार या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, (स्व.) प्रेमीलाताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्टच्या सचिव सौ. गौरीताई राहूल चव्हाण, सौ. मंगलवहिनी अधिकराव चव्हाण, अजित राव पाटील - चिखलीकर, भानुदास माळी, प्रमोद पाटील, संजय ओसवाल, संतोष शेलार, युवा नेते राहुल चव्हाण, इंद्रजित चव्हाण, झाकीर पठाण, नामदेवराव पाटील, निवासराव थोरात, विद्याताई थोरवडे, गीतांजली थोरात, सिद्धार्थ थोरवडे, नानासो जाधव, उदय थोरात, संजय तडाखे, योगेश लादे, अमित जाधव, संग्राम पवार, सतीश पाटील, दिग्विजय सूर्यवंशी, उदय आबा पाटील, अविनाश नलवडे, अवधूत पाटील, सुनील बरीदे यांच्यासह कराड शहर व परिसरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

उमेश चव्हाण म्हणाले, पूर्वी एड्स हा रोग एखाद्या माणसाच्या चारित्र्यावर बोट ठेवणारा होता. एखाद्या रुग्णाचा आजार जाहीर न करणे हा नियम आहे. पण या नियमाचे उल्लंघन होताना दिसते. याबाबत वैद्यकीय क्षेत्रात दंड अथवा शिक्षेची तरतूद नाही. एखाद्यास आर्थिक मदत करताना झाकली मूठ सव्वालाख याप्रमाणे असावी. एमआरआय मशीन बाहेरच्या देशातून आणल्याने टॅक्सचा भुर्दंड सर्वसामान्य लोकांना सोसावा लागतो. ते म्हणाले, शालेय अभ्यासक्रमात आरोग्याचा विषय जागृतीसाठी आणणे महत्वाचे आहे. वैद्यकीय मदत कशी मिळवावी, हे अभ्यासक्रमात नसल्याची खंत वाटते. याबाबत साहित्यिक क्षेत्रात लिखित नसून, चित्रपटात दाखवले जात नाही. हीदेखील शोकांतिका आहे. एखाद्याचे एक लाख साठ हजार रुपये वार्षिक उत्पन्न असेल, तर चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये पूर्ण बील माफ होते. व तीन लाख साठ हजार रुपये वार्षिक उत्पन्न असेल तर निम्मे बील माफ होते.



ते म्हणाले, समाजसेवी संस्था व धर्मादाय संस्था ह्या समाजाच्या गरजेसाठी व विकासासाठी असतात. कोरोनाच्या संकटकाळात मदतीसाठी काढलेल्या संस्था व ट्रस्टने लोकांची लूट केली.

रुग्णांचे हक्क व अधिकारांवर दररोज दरोडे पडत आहेत. याकरिता सर्वसामान्य लोकं जागृत झाली पाहिजेत. श्री. चव्हाण यांनी वैद्यकीय अभ्यासक्रम महागडा आहे, हे मान्य आहे. याच शिक्षणासाठी देश व राज्याच्या बजेट मध्ये तरतूद केल्यास हे शिक्षण सुलभ होईल. मोफत वैद्यकीय शिक्षण घेतलेला डॉक्टर हा रुग्णांचे आर्थिक नुकसान टाळणारा असेल. जोपर्यंत ह्रुदयात माणुसकीची भावना तयार होणार नाही. तोपर्यंत वैद्यकीय क्षेत्र विचाराच्या पलिकडे असेल.

यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, कराडकरांच्या मनात आरोग्य विषयी कुतूहल जागृत व्हावे. रुग्णांना हक्क व अधिकार दिले आहेत ते समजले पाहिजेत. नक्की व्यवस्थेत दोष आहे. परंतु इंग्लंड व अमेरिकेमध्ये शंभर टक्के उपचार मोफत होतात. याच पद्धतीने आपल्या देशात शंभर टक्के उपचार शासकीय खर्चाने झाले पाहिजेत. व त्यासाठी तरतूद झाली पाहिजे.

विकसित राष्ट्र निर्माण करताना उपचार मोफत झाले पाहिजेत. केंद्र व राज्य सरकारचे आरोग्य आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष आहे. देशाच्या एकूण उत्पन्नापैकी चार ते साडेचार टक्के तरतूद झाल्यास मोफत वैद्यकीय उपचार होतील. यासाठी आग्रह धरला पाहिजे. सौ. गौरीताई राहूल चव्हाण यांनी प्रास्ताविक केले.

त्या म्हणाल्या, माजी खासदार प्रेमलाताई चव्हाण यांच्या सेवाभावी विचासरणीच्या प्रेरणेने चॅरिटेबल ट्रस्टची निर्मिती झाली. या माध्यमातून गेल्या २१ वर्षांपासून समाज उपयोगी उपक्रम घेतले जात आहेत. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी उमेश चव्हाण यांचे स्वागत केले. सचिन तडाखे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# सातार्‍यात विरोधी आंदोलकासाठी पोलिसांचा माणुसकीचा मिलाप

सातारा (अजित जगताप): कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी समाजावर अधिक असते. परंतु, त्याचा नेमका ठपका हा पोलीस यंत्रणेवर ठेवला जातो. तरीही सातार्‍यात जबाबदारी व कर्तव्याचे भान ठेवणार्‍या पोलिसांच्या माणुसकीच्या कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २४ मार्च २०२५ रोजी आंदोलक अनिल बाबुराव काजारी यांच्यावर पाटण तालुक्यातील ढेबेवाडी पोलीस ठाण्यात खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप करून त्यांनी उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेत ढेबेवाडी पोलीस ठाण्याचे दोन पोलीस व एक अधिकारी सातारा जिल्हाधिकारी कार्यासमोरून उपोषण स्थळी आले होते. त्यांनी अनिल काजारी यांचे खोट्या गुन्ह्यातून नाव वगळण्याचे आश्वासन दिल्यामुळे त्यांनी उपोषण मागे घेतले. त्यानंतरही त्यांच्यावरील गुन्हा मागे न घेता त्यांच्या विरोधात अब्रूंचा दावा दाखल करणारी नोटीस पाठवली. तसेच सतत होणार्‍या त्रासाला कंटाळून आंदोलक अनिल काजारी यांनी पुन्हा एकदा २५ एप्रिल पासून सातारा जिल्हाधिकारी




कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले.

भर उन्हामध्ये तापमान वाढले असताना न्याय मागणीसाठी आंदोलन करणार्‍या अनिल काजारी यांना सावली देण्यासाठी ढेबेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस एस. के. थोरात यांनी जबाबदारी आणि कर्तव्य ओळखून माणुसकी दाखवली. आंदोलकांच्यावर अनेकदा अपमान व लाठीमार झाल्याचे पाहिलेले आहे.

पण सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलकांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी एक मानवतावादी पोलीस हाती छत्री घेऊन उभा असल्याचे पाहून अनेकांनी त्याचे कौतुक केले आहे. शेवटी माणुसकी श्रेष्ठ ठरले आहे.

सातारा पोलीस सुद्धा एक माणूस आहे आणि त्याच्याकडे माणुसकी असते. हे पाहून खर्‍या अर्थाने आपण खारट झालेल्या समुद्रात गोड पाणी शोधण्याचा प्रयत्न करत असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते अजित निकम, अमर गायकवाड यांनी दिली. तसेच त्या पोलीस बांधवांचे मनापासून आभार मानले आहे.

# तिसरा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय लघुपट पुरस्कार सोहळा

मुंबई(गुरुनाथ तिरपणकर): आर्यारवी एंटरटेनमेंटचा तिसरा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट पुरस्कार वितरण सोहळा नुकताच शिशुविकास हॉल, बेस्ट वसाहत, राजकमल स्टुडिओ जवळ, परेल येथे सिने-नाट्य क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व विजेत्या लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप कबरे, अभिनेते जयराज नायर, अभिनेते खलील शिरगांवकर, शिर्के प्रतिष्ठानचे अँड सुनिल शिर्के, जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, समाजसेविका सीमाताई पाटील, विनोदी अभिनेते जयवंत भालेकर, कांचन पगारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश स्तवनाने झाली. आर्यारवी एंटरटेनमेंटचे महेश्वर तेटांबे यांनी प्रास्ताविक केले. नृत्यदिग्दर्शक अनिल सुतार, अभिनेता सागर सातपुते यांच्या अस्खलित



सूत्रसंचालनाने प्रेक्षकांची मने जिंकली. अरुण होर्णेकर, मनोहर आचरेकर, निलांबरी खामकर, प्रदीप कबरे, लक्ष्मण गुरव, जयंत घाटे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

निवेदक अनिल सुतार आणि सागर सातपुते यांनी लघुपट स्पर्धेचा निकाल जाहीर केला या निकालात कै.भिकाजी महादेव तेटांबे कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ शाश्वत (प्रथम विजेता) रोख रक्कम २५ हजार,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, लोकनेते कै.विठ्ठलदादा खाडे आणि कै. सुनीताताई विठ्ठलराव खाडे यांच्या स्मरणार्थ शूलेस (द्वितीय विजेता) रोख रक्कम १५ हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, प्रपोजल (तृतीय विजेता) रोख रक्कम १० हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, चटका (उत्तेजनार्थ विजेता) रोख रक्कम ५ हजार,सन्मानपत्र, सन्मानचिन्ह तसेच उत्तेजनार्थ, वैयक्तिक पारितोषिके कै.शामराव नारायण व्हटकर, कै. हौसाबाई शामराव व्हटकर, कै गीता आनंदा जाधव यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष श्री गुरुनाथ तिरपनकर यांच्या जनजागृती सेवा संस्थेच्या माध्यमातून, खलील शिरगांवकर, अँड.सुनिल शिर्के, अभिनेत्री लक्ष्मी मनिष गुप्ता यांच्या माध्यमातून अनेक पुरस्कार प्रदान करण्यात आले. दिग्दर्शक राजवीर आनंदा जाधव यांनी विशेष मेहनत घेऊन योगदान दिले. सिने ग्राफिक डिझायनर मनिष व्हटकर, अभिनेता सुरेश डाळे, निर्माते, दिग्दर्शक आनंद खाडे, प्रनेश लोगडे, अभिनेत्री लक्ष्मी मनिष गुप्ता, प्रसिद्ध अभिनेते रवी मोरे, बाळा चौकेकर, निलेश घाडी, सिनेरामा प्रॉडक्शनचे राम माळी यांनी विशेष मेहनत घेतली.

शिरोडकर हायस्कूल १९८८ अधिवेशनच्या मित्रपरिवार देवेंद्र पेडणेकर, अजीत साकरे सुरेश गुरव, श्रीकांत आयरे, संजय गवाणकर, मिनार अनिल म्हापणकर, विनायक हळदणकर आणि संदिप चव्हाण यांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. शेवटी प्रसिद्ध निर्माते,दिग्दर्शक आनंद खाडे यांनी आभार मानले.

# निसर्ग हटवून विकास नको-श्री.छ.सौ.दमयंतीराजे भोसले

सातारा : निसर्ग नाही तर आम्ही नाही.विकासाच्या नावाखाली संवेदनशील क्षेत्र हटविले जात आहे. तोडली जाणारी झाडे टिकविणे गरजेचे आहे.निसर्ग हटवून कोणताही विकास नको असे दमयंतीराजे भोसले यांनी वाई येथे सांगितले. सुरुर वाई महाबळेश्वर पोलादपूर या रस्त्याच्या रुंदीकरणात सुमारे दोनशे वर्षांपूर्वीच्या ब्रिटिशकालीन शेकडो जुने वृक्ष हटविले जाणार आहेत.याविरोधात वाई शहरातील वृक्ष प्रेमी एकवटले आहेत. ही निसर्ग संपदा हटवू नये या मागणीसाठी वाई, पाचगणी, महाबळेश्वर येथील पर्यावरणप्रेमींनी वाई शहरात कृतज्ञता फेरी( रॅली) काढली. या फेरीचे नेतृत्व दमयंतीराजे भोसले यांनी केले.या रॅलीत शेकडो कार्यकर्ते युवती महिला सहभागी झाले होते.

या तिसर्‍या कृतज्ञता यात्रेची सांगता किसन वीर चौकात झाली.या वेळी त्या बोलत होत्या. एव्हडी जुनी झाडे तोडून होणारा विकास आम्हाला नको.तिथे राहणारे पक्षी जीव जंतू आणि आमचा श्वास तोडला जात आहे. विकासाच्या नावाखाली निसर्ग भकास करून नव्याने कोणताही रस्ता होणार नाही.त्याला आमचा सर्वांचा विरोधच राहील असे दमयंतीराजे भोसले यांनी सांगितले.

हटविली जाणारी सर्व झाडे ही देशी प्रकारातली आहेत. या झाडांवर प्राण्यांचा नैसर्गिक अधिवास आहे. झाडे हटविल्यास त्याचा मोठा परिणाम वातावरणाच्या बदलावर होईल. परिसरातील पाण्याची भूजल पातळी घटेल. शेती उत्पादनावर परिणाम होईल .रस्ता रुंदीकरणामुळे आजूबाजूची शेती आणि छोटे छोटे व्यवसाय अडचणीत येतील. ज्या रस्त्याचे रुंदीकरण सुरू आहे. तो रस्ता महाबळेश्वर सारख्या पर्यटन स्थळावर जातो आणि याच रस्त्यावर मोठा नैसर्गिक अधिवास आहे. त्यामुळे झाडांचे संवर्धन करूनच रस्त्याचे काम करावे, अन्यथा तीव्र आंदोलन करू इशारा पर्यावरणप्रेमींनी दिला. या फेरीत नीरज हातेकर,चित्रपट दिग्दर्शक अमीन हाजी, लेखिका ऐश्वर्या रेवडकर व राजेंद्र खरात, भाऊ मेहता, प्रशांत डोंगरे,नागेश मोने,कल्याण पिसाळ शहरातील सर्व संस्था, सर्व स्तरातील लोक तरुण लहान मुले ज्येष्ठ नागरिक महिला सहभागी झाल्या होत्या.

# माजी सैनिक प्रशांत कदम आदर्श सैनिक पुरस्काराने सन्मानित

कराड : वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी श्री शिवाजी फाउंडेशन मलकापूर कराड यांच्या वतीने राज्यस्तरीय अत्यंत प्रतिष्ठेचा यशवंतराव चव्हाण कृष्णा काठ कृतज्ञता दीपस्तंभ गौरव पुरस्कार सन २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री शिवाजी फाउंडेशन तर्फे माजी सैनिक व सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्री प्रशांत कदम यांना राज्यस्तरीय आदर्श सैनिक (फौजी) पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

प्रशांत कदम यांनी भारतीय सैन्य दलात जम्मू-काश्मीर, राजस्थान, पंजाब, बंगाल, हैदराबाद, पुणे अशा अनेक ठिकाणी १७ वर्षे सेवा बजावली सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी वडगाव (उंब्रज) या ठिकाणी यशवंत चारिटेबल



ट्रस्टची स्थापना केली असून या माध्यमातून त्यांनी भारतीय सैन्य ,महाराष्ट्र पोलीस, अर्ध सैनिक बल यामध्ये भरती होणार्‍या तरुण तरुणींना मार्गदर्शन करत फिजिकल ट्रेनिंग भरती पूर्व प्रशिक्षण देत आहेत.

शहीद सैनिकांचे अमृत वीर जवान अभियान अंतर्गत त्यांचे गावोगावी शहीद दिवस साजरे करणे ,सैनिक सन्मान रॅली, तिरंगा रॅली चे आयोजन करून सैनिक व समाजामध्ये जनजागृती करणे, सैनिक मिळावे आयोजित करणे सर्व तालुक्यांमध्ये सैनिक संपर्क अभियान राबवून सैनिकांच्या समस्या जाणून घेणे असे अनेक प्रेरणादायी काम त्यांनी केले आहे त्यांच्या कामाची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श सैनिक (फौजी) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार सर्व सैनिक व सैनिक कुटुंबीय व आप्तेष्ट, कुटुंबीय, मित्र परिवार, अधिकारी गण ज्यांनी मला या सैनिक व सैनिक कुटुंबीयांना न्याय देण्याच्या चळवळी मध्ये मदत केली अशा सर्वांना समर्पित करतो असे माजी सैनिक प्रशांत कदम यांनी म्हटले आहे.

# काश्मीरमध्ये अडकलेल्या जिल्ह्यातील ७ प्रवाशांचा परतीचा मार्ग सुकर

## आ.डॉ.अतुलबाबा भोसलेंकडून तिकिटाची व्यवस्था; शनिवारी रात्री परतणार पर्यटक

कराड : काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या आणि अतिरेकी हल्ल्यामुळे तिथेच अडकून पडलेल्या कराड व सातारा येथील ७ पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले पुढे सरसावले आहेत. त्यांनी खा. उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या सातही प्रवाशांच्या विमान व रेल्वे तिकिटांची व्यवस्था केल्याने, हे पर्यटक शनिवारी (ता. २६) रात्री उशिरा कराडमध्ये सुखरुप परतणार आहेत.

कराडमधील इंटेरियर डिझायनर महेश मिलिंद कुलकर्णी हे आपल्या कुटुंबासमवेत काश्मीरला पर्यटनाला गेले होते. त्यांच्यासमवेत माधवी मिलिंद कुलकर्णी, श्रीधर शामराव क्षीरसागर, वर्षा श्रीधर क्षीरसागर, सुखदा श्रीधर क्षीरसागर हे कराडचे रहिवाशी; तर शरद हरिभाऊ पवार व विद्या शरद पवार हे साताराचे दोघे पर्यटक होते. पहेलगाम येथे अतिरेक्यांनी जेव्हा भ्याड हल्ला केला तेव्हा हे पर्यटक गुलमर्गमध्ये होते.



त्यानंतर ते तातडीने श्रीनगरमध्ये निवासाच्या ठिकाणी पोहचले. दरम्यान, या अतिरेकी हल्ल्यामुळे सर्वत्रच घबराटीचे वातावरण पसरल्याने पर्यटकांनी पुन्हा आपापल्या गावी जाण्यासाठी हालचाल सुरु केली.

कराड व सातारा येथील हे पर्यटक श्रीनगरमध्ये अडकल्याचे समजताच आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी बुधवारी (ता. २३) त्यांच्याशी फोनवरुन प्रत्यक्ष संपर्क साधला. यावेळी त्यांना आणण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय उड्डाण वाहतूकमंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांच्याशी चर्चा करत, तिकिटांची व्यवस्था करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे या सर्व पर्यटकांना दिलासा मिळाला. या पर्यटकांना लवकरात लवकर कराडला सुखरुप आणण्यासाठी आ.डॉ. भोसले यांनी सर्व पातळ्यांवर आपले प्रयत्न सुरु ठेवले. आ.डॉ. भोसले यांनी गुरुवारी (ता. २४) सायंकाळी खा. उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या सातही प्रवाशांसाठी श्रीनगर ते दिल्ली विमान प्रवास आणि दिल्ली ते कराड असे रेल्वे प्रवासाच्या तिकिटांची व्यवस्था केली. आज शुक्रवारी (ता. २५) श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन इंडिगो एअरलाईन्सच्या विमानाने हे सातही पर्यटक दुपारी दीडच्या सुमारास दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुखरुप पोहचले. तिथून पुढे दर्शन एक्सप्रेसने हे सर्व पर्यटक शनिवारी (ता. २६) रात्री उशिरा कराड येथे पोहचणार आहेत. आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी तातडीने विमान व रेल्वे तिकिटांची व्यवस्था केल्याने या पर्यटकांकडून समाधान व्यक्त होत असून, त्यांच्या कुटुंबीयांनी खासदार उदयनराजे भोसले व आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांचे आभार मानले आहेत.

# दीनदयाळ सुतगिरणीस कलकत्याच्या उद्योगपतीची भेट

## अद्यावत प्रकल्प पाहून समाधान

शिराळा : दीनदयाळ मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी इस्लामपूरला दुर्गादेवी रायमेट कलकत्ताचे संचालक व प्रसिद्ध उद्योगपती विवेक काजलीया व त्यांच्या सहकार्यांनी सदिच्छा भेट देऊन माहिती घेतली.यावेळी माजी आमदार,मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष व उद्योगपती मानसिंगराव नाईक, जेष्ठ संचालक सुमंत महाजन उपस्थित होते.महाराष्ट्राचे जेष्ठ नेते,माजी दीनदयाळचे संस्थापक माजी मंत्री



अण्णासाहेब डांगे,एक्झिक्युटिव्ह संचालक ड.राजेंद्र डांगे मार्गदर्शनाखाली व सर्व संचालक व अधिकारी,कर्मचार्‍यांच्या मेहतीमुळे सुतगिरणीची घौडदौड सुरू आहे.त्यामुळेच हे पाहण्यासाठी विवेक काजलीया आले होते.माजी आमदार मानसिंगराव नाईक हे राजकीय व्यक्तिमत्व असले ते चांगली उद्योजक आहेत. त्यामुळे हे दोघे येऊन त्यांनी सुतगिरणी ची पाहणी करून सविस्तर माहिती घेतली.सुतविभाग,गारमेंट विभाग , कापड विभाग,एंब्रोडींग विभाग इत्यादींची माहिती घेतली. सरव्यवस्थापक विनोद देशमुख यांनी त्यांनी सविस्तर माहिती दिली.हा अद्यावत प्रकल्प पाहुन त्यांनी समाधान व्यक्त केले. अर्थव्यवस्थापक राजेंद्र मिरजे यांनी स्वागत केले.संचालक सुमंत महाजन यांनी मानसिंगराव नाईक,विवेक काजलीया यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी उद्योजक स्वानंद महाजन, शिरशीचे उद्योगपती जगदीश जाधव , उत्पादन व्यवस्थापक गिरीश पत्की, विद्युत अभियंता एस. आय. मेत्री, श्रीहरी कुंभार,जावेद पठाण, उपव्यवस्थापक प्रकाश दगडे, कामगार व्यवस्थापक आदित्य यादव, प्रसिद्ध अधिकारी बजरंग कदम, राजेंद्र खोत, संतोष माने,अभिजीत बारपटे उपस्थित होते.